**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाचा महानुभाव पंथ केंद्र आणि विद्याभारती महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने 'महानुभाव साहित्य संमेलनाचे' २१ व २२ एप्रिल रोजी आयोजन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा महानुभाव पंथ केंद्र आणि मराठी विभाग, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने 'महानुभाव साहित्य संमेलनाचे' दि. २१ व २२ एप्रिल, २०१८ रोजी दृकश्राव्य सभागृह, विद्याभारती महाविद्यालय, सी.के. नायडू रोड, कॅम्प, अमरावती येथे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २१ एप्रिल, २०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता ग्रंथदिंडी विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारत परिसरापासून संमेलन स्थळापर्यंत निघणार असून त्याचे संयोजन महंत श्रीजायराजबाबा कारंजेकर करतील. पहिल्या सत्राचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते होणार असून संमेलनाध्यक्ष म्हणून अमरावतीचे महानुभाव साहित्य संशोधक व लेखक श्री पुरुषोत्तमदादा कारंजेकर उपाख्य प्रा. पुरुषोत्तम नागपुरे, अतिथी म्हणून कविश्वर कुलाचार्य श्रीकारंजेकरबाबा महानुभाव, माजी आमदार तथा विद्याभारती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री रावसाहेब शेखावत, अमरावती जिल्हा महानुभाव परिषदेचे अध्यक्ष महंत श्रीतळेगावकरबाबा, कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिति लाभणार असून सत्राचे सूत्रसंचालन श्री संदीप जुनघरे करतील.

दुसऱ्या सत्रांतर्गत 'सातीकाव्यग्रंथातील आशय व आविष्कार' या विषयावर परिसंवाद होणार आहे. अध्यक्षस्थान डॉ. अशोक राऊत भूषवतील. यामध्ये म. मोहनराजदादा अमृते, तपस्विनी अलकाताई कारंजेकर, प्रा. संदीप तडस, डॉ. स्मिता ठाकरे, प्रा. सारिका पाचराऊत यांचा सहभाग राहणार आहे. सूत्रसंचालन सौ. नम्रता पावडे करतील. कविसंमेलनाच्या तिसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. सुखदेव ढाणके भूषविणार असून त्यामध्ये डॉ. हेमंत खडके, डॉ. राज यावलीकर, श्री विष्णू सोळंके, डॉ. रेषा आकोटकर, डॉ. शोभा रोकडे, निलिमा भोजने, डॉ. गिरीष खारकर, श्री अनिल पाटील, श्री राजेश महल्ले, प्रा. राजु शिंदे, डॉ. योगिता पिंजरकर, डॉ. रणजीत गणोदे, अतुल ठाकरे, प्रा. वनिता पोकळे, छाया पाथरे, सारिका निंभोरकर यांचा सहभाग राहणार आहे. सूत्रसंचालन डॉ. मंदा नांदुरकर करतील.

दि. २२ एप्रिल, २०१८ रोजी चवथ्या सत्रात 'सूत्रपाठ-दृष्टांतपाठातील लालित्य व तत्वदर्शन' या विषयावर परिसंवाद होणार आहे. अध्यक्षस्थान डॉ. सुभाष सावरकर भूषवतील. त्यामध्ये डॉ. मोनाताई चिमोटे, डॉ. काशीनाथ बऱ्हाटे, डॉ. भास्कर पाटील, प्रा. राजेंद्र राऊत, प्रा. अंबादास घुले यांचा सहभाग राहणार आहे. सूत्रसंचालन डॉ. गजानन बनसोड करतील. पाचव्या सत्रात 'महानुभावीय चरित्रग्रंथातील जीवनमूल्ये व साहित्य मूल्ये' या विषयावर परिसंवाद होणार आहे. अध्यक्षस्थान डॉ. सतीश तराळ भूषवतील. त्यामध्ये डॉ. अलका गायकवाड, डॉ. सुशीला धाबे, डॉ. राजेश मिरगे डॉ. प्रमोद गारोडे, डॉ. मंदा नांदुरकर यांचा सहभाग राहणार असून सूत्रसंचालन डॉ. कल्पना मेहरे करतील.

सहाव्या सत्रात समारोप समारंभामध्ये अध्यक्षस्थान पुरुषोत्तमदादा कारंजेकर उपाख्य प्रा. पुरुषोत्तम नागपुरे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, अखिल भारतीय महानुभाव परिषद, रिद्धपूरचे अध्यक्ष आचार्य श्री गोपीराजबाबा शास्त्री महानुभाव, विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. मनोज तायडे, श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, किरण नगर, अमरावतीचे अध्यक्ष श्री दादारावजी भडके उपस्थित राहतील.

महानुभाव साहित्य संमेलनाला अखिल भारतीय महानुभाव परिषद जिल्हा समिती, सर्वज्ञ ज्ञान प्रबोधन मंडळ, अमरावती, अमरावती वासनिक सेवा मंडळ, अमरावती, सर्वज्ञ महिला मंडळ, हर्षराज कॉलनी परिसर, अमरावती, महदंबा महिला मंडळ, शेगांव नाका परिसर, अमरावती, महदाईसा महिला मंडळ, चैतन्य कॉलनी, अमरावती, अखिल भारतीय महानुभाव साहित्य युवा मंच, अमरावती, अमरावती वासनिक सेवा महिला मंडळ, अमरावती, मराठी वाङ्मय मंच, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमरावती आणि समस्त महानुभावीय वासनिक मंडळी, अमरावती यांचा उत्स्फूर्त सहभाग राहणार आहे.

सर्व नागरिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अजय देशमुख, विद्याभारती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एफ.सी. रघुवंशी, विद्यापीठ महानुभाव पंथ केंद्राचे समन्वयक डॉ. राजेंद्र सोनपेठकर व महानुभाव साहित्य संमेलनाचे संयोजक डॉ. सतीश तराळ यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १९/०४/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी